॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर | गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ८३ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

*** सुविचार ***

मन खंबीर असेल तर कोणतेही
संकट लहान वाटते.

**वीरभूमी फोडणी**

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

**सावकाश**

अंधार जरी दाटला
तरी येईल प्रकाश
वेग नको जास्त
फक्त चाल सावकाश
जीवन मरणाचा
अधांतरी खेळ
नियती रचते
प्रलयाचा मेळ

# मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण स्थगित

## मराठा आरक्षणासाठी सरकारला ३ महिन्यांची मुदत । यापुढे उपोषण करणार नाही; थेट मुंबईवर धडकणार

**बीड । वीरभूमी –** मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी गेली २० दिवस उपोषणाला बसले होते. आज सरकारच्या शिष्टमंडळाशी झालेल्या चर्चेनंतर मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थगित केले आहे. मात्र आंदोलन सुरुच राहणार आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ५८ लाख नोंदी सरकार रद्द करणार नाही, हैदराबाद गॅझेटचा जीआर सुधारित करणार आहे. माझे काम मराठा समाजासाठी लढण्याचे आहे ते मी करत आहे. मी केवळ समाजासाठी लढू शकतो. ते काम करतो आहे. सरकारची मस्ती मोडणे गरजेचे होते ते आम्ही केले. सरकारला समाजापुढे वाकायला लावले, असे जरांगे यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे पाटील यांची सरकारच्या शिष्टमंडळाने भेट घेतली यावेळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सरकारच्या शिष्टमंडळात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, दादा भुसे, आमदार प्रसाद लाड आणि आमदार सुरेश धस यांचा समावेश होता.



यापुढे काही दगाफटका किंवा धोका झाला, तर उपोषण करणार नाही; थेट मुंबईवर धडकणार, असा इशारा जरांगे पाटील यांनी या वेळी दिला. तसेच, मुंबईत जवळपास १ लाख तरुण गेले आहेत, त्यांनी आता गणपतीचे दर्शन घेऊन माघारी यावे. सरकारला ३ महिन्यांचा वेळ दिला म्हणजे आंदोलन संपले असे होत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यापुढे मनोज जरांगे पाटील यांच्यावर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येणार नाही; देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत आहेत, असे वक्तव्य शिष्टमंडळाकडून करण्यात आले.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ५८ लाख नोंदी कमी होणार नाहीत, याची सरकारने खात्री द्यावी. या नोंदी शोधण्यासाठी आम्ही स्वत: माणसे देतो. शिंदे समिती काम करत नाही आणि सरकारही याकडे लक्ष देत नाही. हे आंदोलन यशस्वी झाल्याशिवाय थांबणार नाही. आम्हाला आश्वासन दिले, तरी आंदोलन सुरूच राहणार आहे. मराठा समाजाशी खुन्नस ठेवणे योग्य नाही. राधाकृष्ण विखे पाटील चुकतात, तरी त्यांच्यावर प्रेम करा. एकनाथ शिंदेंवरही आपण प्रेम करू. जीआर काढून गॅझेटियरची अंमलबजावणी करावी. ५८ लाख नोंदींमधील एकही नोंद कमी व्हायला नकोनोंदी कमी करणार नाही, याची लेखी हमी द्यावी, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आंदोलन पूर्ण यशस्वी झाल्याशिवाय आपण थांबणार नाही, हे मी आधीच सांगितले होते. सरकार सातारा आणि कोल्हापूर गॅझेटसाठी वेळ मागत आहे. सरकार फसवणूक करत आहे असे वाटत असले, तरी त्यांना ३ महिने देऊन ही शेवटची संधी देत आहोत. या ९० दिवसांत काही फरक पडणार नाही. ५८ लाख नोंदी कमी केल्या जाणार नाहीत, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, सरकार ५८ लाख नोंदी कमी करणार नाही. हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र वाटप करताना जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी तहसीलदारांना प्रत्यक्ष सोबत घेऊन बसावे. काही ओबीसी मंत्री अधिका-यांना फोन करून प्रमाणपत्रे वाटप करू नका असे सांगत आहेत.

## SPOT NEWS

### सोन्याच्या हॉलमार्किंग शुल्कात तब्बल ६७ टक्के वाढ

**नवी दिल्ली –** ऐन सणासुदीमध्ये ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार आहे. भारतीय मानक ब्यूरो अर्थात बीआयएसने सोन्याच्या दागिन्यांवरील हॉलमार्किंग शुक्लामध्ये तब्बल ६७ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. बीआयएसने हॉलमार्किंग शुल्कात ३० रुपयांची वाढ केली असून आता प्रति दागिना ७५ रुपये शुल्क मोजावे लागणार आहे. तर दुसरीकडे चांदीच्या दागिन्यांवरील शुक्ल ३५ रुपयांवर कायम ठेवण्यात आले आहे. हे नवीन तर तात्काळ लागू करण्यात आले आहेत. बीआयएसने 'बीआयएस (हॉलमार्किंग) दुरुस्ती नियम, २०२६ अन्वये १४ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. नव्या नियमांनुसार सोन्याचे दागिने खरेदी करणाऱ्याला प्रत्येक दागिनेमागे ७५ रुपये हॉलमार्किंग शुक्ल द्यावे लागेल. तर चांदीचे हॉलमार्किंग शुक्ल ३५ रुपये एवढे कायम ठेवण्यात आले आहे. सीजेसीचे अध्यक्ष राजेश रोकडे आणि उपाध्यक्ष अविनाश गुप्ता यांनी या दरवाढीबद्दल चिंता व्यक्त केली. देशभरात बनावट आणि बेकायदेशीर हॉलमार्किंग केंद्रांवर कारवाई सुरू असताना, अधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या सराफांवरच अतिरिक्त आर्थिक भार टाकला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### गौरींच्या नैवद्यासाठी १६ भाज्या बाजारात दाखल

**पुणे –** महालक्ष्मी गौरींच्या आगमनासाठी (गौरी आवाहन) आणि पूजनासाठी १६ प्रकारच्या भाज्यांचा नैवेद्य दाखवण्याची जुनी परंपरा आहे. गौरी आवाहनाच्या दिवशी म्हणजेच आज दि. १७ सप्टेंबर रोजी प्रामुख्याने भाजी आणि भाकरीचा नैवेद्य दाखवला जातो आणि दुसऱ्या दिवशी गौरी पूजनाला दि. १८ सप्टेंबर १६ भाज्या एकत्र करून मिश्र भाजी किंवा वेगवेगळ्या भाज्या केल्या जातात. त्यानिमित्ताने लातूर शहराच्या भाजी मंडईत १६ प्रकारच्या भाज्यांची आवक मोठ्या प्रमाणात झाली आहे.

# पवनचक्की पाहायला गेलेल्या युवतीवर सामुहिक अत्याचार

**अहिल्यानगर । वीरभूमी –** पवनचक्की पाहण्यासाठी मानलेल्या भावासोबत देवगाव (ता. अहिल्यानगर) परिसरात गेलेल्या युवतीला दोन तरूणांनी दुचाकीवरून निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर सामुहिक अत्याचार केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या घटनेत युवतीच्या सोबत असलेल्या युवकालाही दोघांनी मारहाण केली. दरम्यान, घटनास्थळी आलेल्या दोन तरूणांनी पीडित युवतीची व तिच्या मानलेल्या भावाची सुटका केली. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात दोन संशयितांविरूध्द बुधवारी (१६ सप्टेंबर) पहाटे गुन्हा दाखल केला आहे.

पीडित युवतीने (वय २२) फिर्याद दिली आहे. फिर्यादी युवती अहिल्यानगर शहरात खासगी नोकरी करते. ती शहरातील सावेडी परिसरात भाड्याच्या खोलीत राहते. तिच्यासोबत काम करणारा २० वर्षीय युवक हा तिचा मानलेला भाऊ असून तो नाशिकचा असल्याचे तिने फिर्यादीत नमूद केले आहे. फिर्यादीनुसार, मंगळवारी सायंकाळी ड्यूटीवरून सुटल्यानंतर फिर्यादी व तिचा मानलेला भाऊ दुचाकीवरून देवगाव परिसरात पवनचक्की पाहण्यासाठी गेले होते. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ते देवदरी हॉटेलसमोरील एका पवनचक्कीजवळ गेले. तेथे ते पवनचक्की पाहत असताना सायंकाळी सातच्या सुमारास दुचाकीवरून दोन तरूण तेथे आले. त्यांनी त्या ठिकाणी येण्याबाबत विचारणा करून युवती व तिच्या सोबतच्या युवकाला शिवीगाळ केले. त्यानंतर एका तरूणाने युवतीला त्यांच्या दुचाकीवर बसण्यास सांगितले. तिने नकार दिल्यानंतर तिच्या सोबतच्या युवकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. त्यानंतर युवतीला जबरदस्तीने दुचाकीवर बसविण्यात आले, तर दुसर्या तरूणाने तिच्या सोबतच्या युवकाला त्याच्या दुचाकीवर बसवून घेतले.

दोन्ही दुचाकी अहिल्यानगर रोडने घाटाच्या दिशेने नेण्यात आल्या. त्यानंतर मच्छिंद्रनाथाच्या कमानीतून कच्च्या रस्त्याने निर्जन भागात नेण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तेथे युवतीने त्यांना आपण काय चूक केली, असे विचारून सोडून देण्याची विनंती केली. मात्र, तिच्या सोबतच्या युवकानेही त्यांना सोडण्याची विनंती केली असता त्याला पुन्हा मारहाण केली. दोघांचे मोबाईल हिसकावून घेतले. तसेच दोघांनी तिला धमकावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. पीडिता व तिच्यासोबतचा युवक आरडाओरड करत असताना तेथे एक तरूण आला. त्याने दोघांना असे कृत्य करू नका, असे सांगितले. मात्र, संशयितांनी त्यालाही तेथून जाण्यास सांगितले.

काही वेळाने तो तरूण आणखी एका साथीदारासह पुन्हा घटनास्थळी आला. त्यांनी पीडित युवती व तिच्या सोबतच्या युवकाची सुटका केली. त्यानंतर संशयित दोघे मोबाईल परत देऊन दुचाकीवरून तेथून पसार झाले. मदतीला आलेल्या तरूणांनी पीडितेला धीर देत पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी पीडित युवतीला धीर देत फिर्याद नोंदवून घेतली. सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे अधिक तपास करीत आहेत.

# एसटीच्या 'एनसीएमसी' कार्ड सक्तीचा निर्णय ३० सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलला

**मुंबई । वीरभूमी –** एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' कार्ड १ सप्टेंबर २०२६ पासून अनिवार्य केले होते पण आता याबाबत निर्णय घेत या योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. आता कार्डची सक्ती ३० सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात एसटीने प्रवास करणाऱ्या महिला आणि ज्येष्ठांना दिलासा मिळाला आहे.

शासनाच्या सवलतीचा लाभ घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना 'एनसीएमसी' कार्ड १ सप्टेंबर २०२६ पासून अनिवार्य करण्यात आले होते. शासनाच्या सवलतीचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांना हा निर्णय बंधनकारक करण्यात आला होता. ज्यानंतर अनेक प्रवाशांनी कार्ड घेतले होते. पण हे कार्ड घेताना अनेक प्रवाशांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागले होते.

'एनसीएमसी' कार्ड अनिवार्य केल्यानंतर डिजिटल तिकीट प्रणालीवर प्रवाशांचा मोठा भार पडला. त्यामुळे एसटीच्या सर्व्हरवर ताण येऊन वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत होत्या. सर्व्हर सतत डाऊन होणे, तसेच मोठ्या प्रमाणात 'हिट्स' वाढल्याने वाहकांना सवलतीची तिकिटे देताना अडचणी येत होत्या. परिणामी बस स्थानकांवर आणि बसमध्ये प्रवाशांची गैरसोय होत होती. या पार्श्वभूमीवर महामंडळाने कार्ड सक्तीला मुदतवाढ दिली आहे.

३० सप्टेंबरपर्यंत महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना पूर्वीप्रमाणे आधार कार्ड किंवा अन्य अधिकृत ओळखपत्र दाखवून सवलतीचे तिकीट घेता येणार आहे. त्यासाठी एनसीएमसी कार्ड असणे बंधनकारक राहणार नाही.

# अहिल्यानगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात यावर्षीपासूनच प्रवेश सुरु

## केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून परवानगी । मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोशल पोस्ट

**अहिल्यानगर । वीरभूमी –** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने सुरू होणाऱ्या अहिल्यानगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाल्याने यावर्षीपासूनच प्रवेश सुरु होणार आहेत. दरवर्षी १०० एमबीबीएस विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेसह महाविद्यालय सुरू करण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने परवानगीपत्र देण्याबाबत दाखल करण्यात आलेले दुसरे अपील मान्य केले आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मिडियावर पोस्ट टाकत आभार मानले आहे.

या निर्णयामुळे अहिल्यानगरमध्ये शासकीय वैद्यकीय शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली जाणार असून, यंदाच १०० विद्यार्थ्यांना एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून मान्यता मिळविण्याची प्रक्रिया सुरू होती. या प्रक्रियेत महाविद्यालयामार्फत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडे दुसरे अपील दाखल करण्यात आले होते. या अपीलावर दुसऱ्या अपील समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुपालनार्थ केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने अपील मान्य केले आहे.

मंत्रालयाच्या निर्णयानुसार, २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी अहिल्यानगर येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी दरवर्षी १०० एमबीबीएस विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता ठेवून परवानगीपत्र देण्याची प्रक्रिया पुढे नेण्यात आली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने याबाबत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाला अवगत केले आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला महत्त्वपूर्ण गती मिळाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू होणे हे वैद्यकीय शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यानंतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना एमबीबीएसचे शिक्षण घेण्यासाठी स्थानिक पातळीवर एक महत्त्वाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. यासोबतच वैद्यकीय उपचारांच्या सुविधांमध्येही वाढ होण्याची अपेक्षा आहे.



# SPOT NEWS

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राजूर पोलिसांची २३ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

**● अकोले । वीरभूमी -**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, सार्वजनिक शांतता कायम राहावी आणि नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी राजूर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. विविध गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या २३ जणांना प्रवेशबंदीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ अन्वये संगमनेर उपविभागातील राजूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संबंधित व्यक्तींवर ही कारवाई करण्यात आली आहे. संबंधितांवर यापूर्वी विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याने गणेशोत्सवाच्या काळात त्यांच्याकडून पुन्हा कोणतेही बेकायदेशीर कृत्य होऊ नये, तसेच कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, या उद्देशाने हे आदेश देण्यात आले आहेत. दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून ते दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीत तसेच संगमनेर व अकोले तालुक्यांच्या स्थळसीमा हद्दीत या २३ व्यक्तींना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. हे आदेश अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्या मार्गदर्शनाखाली राजूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ अन्वये पारित केले आहेत.

## रिपाइ वाहतूक आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षपदी विल्सन रुकडीकर यांची नियुक्ती

**● अहिल्यानगर । वीरभूमी -**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) वाहतूक आघाडीच्या अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्षपदी विल्सन रुकडीकर यांची नियुक्ती करण्यात आली. रिपाइ गवईचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांच्या हस्ते रुकडीकर यांना नियुक्तिपत्र देण्यात आले. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रुकडीकर यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)च्या माध्यमातून शहरात संघटन मजबूत करण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिक, वाहनचालक, वाहतूक क्षेत्राशी संबंधित कामगार तसेच विविध घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी वाहतूक आघाडीच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी रुकडीकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. यावेळी गुलाम शेख, विजय शिरसाठ, नईम शेख, अजीम खान, शुभम ठोंबे, लकी वाघमारे, जमीर सय्यद, अरबाज शेख, राहुल ठोकळ, प्रकाश थोरात, योहान चाबुकस्वार, फयाज शेख, रईस शेख, निखिल मगर, शाम ससाणे, तौसिफ शेख, जावेद सय्यद, जफर काझी, योगेश जावळे आदींसह रिपाइ गवईचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या नियुक्तीप्रसंगी रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के म्हणाले की, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) ची विचारधारा आणि पक्षाची भूमिका शहरातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संघटनात्मक पातळीवर सातत्याने काम सुरू आहे. वाहतूक क्षेत्र हे शहराच्या दैनंदिन जीवनातील अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे. या क्षेत्राशी संबंधित विविध प्रश्न आणि अडचणी सोडविण्यासाठी वाहतूक आघाडीने सक्रिय भूमिका बजावणे गरजेचे आहे. विल्सन रुकडीकर यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी ते सक्षमपणे पार पाडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नवनियुक्त वाहतूक आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष विल्सन रुकडीकर म्हणाले की, रिपाइ गवईच्या वाहतूक आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी व माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे.

# टाहाकारीच्या जगदंबा मंदिर परिसरात यादवकालीन शिलालेख

### शिलालेखामुळे प्रारंभिक यादव राजवटीचा इतिहास, मंदिर व्यवस्थापन आणि मराठी भाषेच्या प्राचीन स्वरूपावर महत्त्वपूर्ण प्रकाश पडणार

**■ विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी -**



अकोले तालुक्यातील टाहाकारी येथील ऐतिहासिक जगदंबा मंदिर परिसरातील भूमिज शैलीच्या मंदिर संकुलात १२व्या शतकातील यादवकालीन शिलालेख आढळून आला आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारावरील खांबावर कोरलेल्या या शिलालेखामुळे प्रारंभिक यादव राजवटीचा इतिहास, मंदिर व्यवस्थापन आणि मराठी भाषेच्या प्राचीन स्वरूपावर महत्त्वपूर्ण प्रकाश पडणार आहे. प्रचंड झीज झालेल्या या शिलालेखाच्या वाचनाचे काम पुण्यातील इतिहास संशोधक अथर्व पिंगळे आणि पुराभिलेख अभ्यासक अनिल दुधाणे करीत आहेत.

एकूण ११ ओळींचा हा शिलालेख नागरी लिपीत कोरलेला असून, त्यातील अनेक अक्षरे झिजल्यामुळे अस्पष्ट झाली आहेत. प्राथमिक वाचनानुसार, शिलालेखात यादव वंशातील राजा आईरमदेव याचा उल्लेख आहे. मंदिरासाठी तसेच त्याच्या व्यवस्थापनासाठी करण्यात आलेल्या तरतुदी आणि मंदिराच्या देखभालीसाठी गुरवास काही रक्कम दिल्याचा उल्लेखही त्यात आढळतो. शिलालेखाची सुरुवात संस्कृत भाषेतील प्रशस्तीने, तर शेवटचा भाग मराठी भाषेत आहे. संपूर्ण मजकूर गद्य स्वरूपात आहे.

### यादव राजाच्या बिरुदावलीचा उल्लेख

शिलालेखाची सुरुवात 'ओं स्वस्ति स्री' या मंगलवचनाने झाली आहे. पहिल्या पाच ओळींमध्ये यादव राजा आईरमदेवाची बिरुदावली कोरलेली आहे.

ओं स्वस्ति स्री
परमभट्टारक द्वारावतिपुरवराधिस्वर
यादवकुलकमलकलिकाविकासभास्कर
रायसामंत इत्यादि समस्तराजावलिविराजित
महामंडलिक स्री आईरमदेव

त्यानंतर मंदिराच्या व्यवस्थापनासंबंधीच्या तरतुदींचा उल्लेख असल्याचे प्राथमिक वाचनातून स्पष्ट झाले आहे. शिलालेखात कालोल्लेख नसला तरी, तो यादव राजांच्या प्रारंभिक कोरीव लेखांपैकी एक असून, मराठी भाषेतील अतिशय प्राचीन शिलालेख ठरण्याची शक्यता आहे.

### अश्वी ताम्रपटानंतर दुसरा ज्ञात कोरीव लेख

राजा आईरमदेवाचा इ.स. १०९८ सालचा अश्वी ताम्रपट यापूर्वी ज्ञात होता. टाहाकारी येथील हा शिलालेख त्याचा दुसरा ज्ञात कोरीव लेख ठरतो. अश्वी ताम्रपटावरून आईरमदेव हा चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा मांडलिक असल्याचे दिसते. मात्र, टाहाकारीच्या शिलालेखात विक्रमादित्याचा नामोल्लेख आढळत नाही. हा शिलालेख अश्वी ताम्रपटाच्या आधीचा आहे की नंतरचा, हे निश्चित सांगता येणे अवघड असल्याचे संशोधक अथर्व पिंगळे यांनी सांगितले.

### मंदिर संकुलाच्या इतिहासावर नवा प्रकाश

टाहाकारीतील या मंदिर संकुलाला सध्या चालुक्यांनी बांधलेले मंदिर संकुल असे संबोधले जाते. मात्र, नव्याने उपलब्ध झालेल्या शिलालेखातील माहितीवरून येथील मंदिर यादव राजांनी बांधली असल्याचे स्पष्ट होत असल्याचे पुराभिलेख अभ्यासक अनिल दुधाणे यांनी सांगितले. भूमिज स्थापत्यकलेतील हा मंदिरसमूह शिल्प आणि स्थापत्याच्या दृष्टीने उत्कृष्ट नमुना असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या संशोधन कार्यात बाच्छव नरहारी एखंडे (माजी सरपंच व समाजसेवक, श्रीक्षेत्र टाहाकारी), वेणुनाथ नरहारी एखंडे (एस.टी. बस वाहक, सिन्नर) आणि अरुण दत्तात्रय एखंडे (युवा कार्यकर्ता व समाजसेवक, टाहाकारी) यांनी विशेष सहकार्य केले.

## नागवडे कारखान्याची १८ सप्टेंबरला वार्षिक सभा; १९ रोजी भव्य शेतकरी मेळावा

**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची ६१ वी अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता कारखाना कार्यस्थळावर आयोजित करण्यात आली आहे. कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार असून, सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. मेघा औटी यांनी केले आहे.

वार्षिक सभेची नोटीस व अहवाल सभासदांना पाठविण्यात आला आहे. सभासदांनी सभेच्या कामकाजात सहभागी होऊन आवश्यक विषयांवर चर्चा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, कारखान्याचे संस्थापक तथा साखर संघाचे दिवंगत अध्यक्ष स्वर्गीय शिवाजीराव बापू नागवडे यांच्या आठव्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कारखाना व अंकुश पाटील तंत्रज्ञान, पलूस यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय बापूंच्या स्मृतिस्थळी हा मेळावा होणार आहे.

या मेळाव्यात ऊस व इतर पिकांचे व्यवस्थापन, कीड नियंत्रण, तसेच घरच्या घरी वॉटर सोल्युबल कृषी खते, कृषी संजीवके, कीटकनाशके व बुरशीनाशके तयार करण्याबाबत प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, हा मेळाव्याचा उद्देश आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच शेतकरी मेळाव्यास सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन व्हाईस चेअरमन सौ. मेघा औटी व सर्व संचालक मंडळाने केले आहे.

# राजूर पोलिसांनी १० मोबाईल शोधून काढले

### तांत्रिक विश्लेषणातून दीड लाखांचे मोबाईल मूळ मालकांच्या स्वाधीन

**● अकोले । वीरभूमी-**




राजूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गहाळ तसेच चोरी झालेल्या १० मोबाईलचा शोध घेण्यात राजूर पोलिसांना यश आले आहे. सुमारे दीड लाख रुपये किमतीचे हे मोबाईल संबंधित तक्रारदारांना परत करण्यात आले. गेल्या काही दिवसांत मोबाईल चोरी व गहाळ होण्याचे प्रमाण वाढल्याने पोलिसांनी विशेष मोहीम राबवून ही कारवाई केली.

सीईआयआर पोर्टलवरील तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गहाळ मोबाईलची माहिती मिळवून त्यांच्या लोकेशनचा शोध घेण्यात आला. त्यानुसार राजूर पोलिसांनी नाशिक, संगमनेर, अहिल्यानगर व घोटी परिसरातून १० मोबाईल शोधून काढले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या हस्ते हे मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना सुपूर्द करण्यात आले. हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने तक्रारदारांनी समाधान व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले.

ही कारवाई अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक मुक्काम सुदर्शन, पोलीस उपअधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे व सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या शोध मोहिमेत पोलीस कॉन्स्टेबल उषा मुठे व सुवर्णा घोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

मोबाईल हरवल्यास किंवा चोरीस गेल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. तसेच सीईआयआर पोर्टलवर तक्रार अपलोड केल्यास मोबाईल शोधण्यास मोठी मदत होते. वेळेत तक्रार नोंदवल्यास मोबाईल परत मिळण्याची प्रक्रिया सुलभ होते, असे आवाहन पोलीस कॉन्स्टेबल उषा मुठे यांनी केले.

# स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासून करा

### मुख्याधिकारी विजया घाडगे । घनकचरा व्यवस्थापन व कचरा वर्गीकरणाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**● शेवगाव । वीरभूमी-**

स्वच्छता ही केवळ वैयक्तिक आरोग्याशी संबंधित बाब नसून सामाजिक सौंदर्य आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्वाचे मूल्य आहे. घर, परिसर, प्रभाग, शाळा, शहर आणि देश स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. स्वच्छतेची अपेक्षा इतरांकडून करण्यापेक्षा त्याची सुरुवात स्वतः पासून करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शेवगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी केले.



शेवगाव : बाळासाहेब भारदे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापन व कचरा वर्गीकरणाबाबत मार्गदर्शन करताना मुख्याधिकारी विजया घाडगे. (छाया : अमोल कराळे)

शेवगाव येथील बाळासाहेब भारदे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात नगरपरिषदेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापन आणि कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमांतर्गत बुधवारी (दि. १६) विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे सचिव हरीश भारदे, प्राचार्य उमेश घेवरीकर, नगरसेवक वजीर पठाण, सुवर्णा मगरे, प्रवीण बैरागी आदी उपस्थित होते.

विजया घाडगे म्हणाल्या, कचऱ्याचे योग्य पद्धतीने वर्गीकरण व विल्हेवाट लावणे ही स्वच्छ शहरनिर्मितीची पहिली पायरी आहे. कचरा व्यवस्थापनाबाबत नागरिकांनी हलगर्जीपणा केल्यास त्याचे गंभीर परिणाम पर्यावरणावर होतात. आज आपण केलेल्या चुकीचे परिणाम भविष्यातील पिढ्यांना भोगावे लागू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतः स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून त्या कुटुंबात आणि परिसरात रुजवाव्यात.

विद्यार्थीदशेत लागलेल्या चांगल्या सवयी आयुष्यभर उपयोगी पडतात. त्यामुळे कचरा कुठेही न टाकता त्याची योग्य विल्हेवाट लावणे, ओला व सुका कचरा वेगळा ठेवणे, प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळणे तसेच परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याधिकारी विजया घाडगे यांचा संस्थेचे सचिव हरीश भारदे व प्राचार्य उमेश घेवरीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन निलेश मोरे यांनी केले.

### वै. ह.भ.प. कृष्णदेव महाराज काळे यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त

# दहिगावने येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**● शेवगाव । वीरभूमी-**

शेवगाव तालुक्यातील दहिगावने येथील दध्नेश्वर शिवालयाचे संस्थापक वै. ह.भ.प. कृष्णदेव महाराज काळे यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

वै. पांडुरंग महाराज घुले, वै. विठ्ठलनाथ बाबा आणि वै. नवनाथ महाराज काळे यांच्या कृपाशीर्वादाने तसेच श्री क्षेत्र देवगड संस्थानचे पीठाधीश्वर ह.भ.प. भास्करगिरीजी महाराज आणि सुदामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार आहे. गुरुवार, दि. १७ रोजी सोहळ्याला प्रारंभ होणार असून गुरुवार, दि. २४ रोजी सप्ताहाची सांगता होणार आहे.

सप्ताहाच्या कालावधीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, काकडा भजन, प्रवचन, हरिपाठ, हरिकीर्तन आणि जागर आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहकाळात विठ्ठल महाराज खाडे, श्रीराम महाराज चोपडे, गोरक्षनाथ महाराज मिर्झे, सीताराम महाराज चेडे, गणपत महाराज आहेर आणि नरसिंह महाराज मुकुटकर यांची प्रवचने होणार आहेत. तसेच संजय महाराज शिंदे, शुभम महाराज कांडेकर, आदिनाथ महाराज शास्त्री, स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, रामगिरी महाराज येळीकर, दादा महाराज वायसळ, प्रल्हाद महाराज कड आणि देविदास महाराज म्हस्के यांची हरिकीर्तने होणार आहेत.

गुरुवर्य सुदामदेव महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. त्यानंतर 'घुले पाटील मित्र मंडळ, दहिगावने' यांच्या वतीने उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहकाळात श्री क्षेत्र देवगड संस्थानचे पीठाधीश्वर भास्करगिरीजी महाराज आणि स्वामी संगीत चैतन्य महाराज हे विशेष सदिच्छा भेट देणार आहेत. सोहळ्याचे व्यासपीठ चालक म्हणून गणपत महाराज आहेर आणि रामकृष्ण महाराज काळे काम पाहणार आहेत. कृष्णा महाराज साळुंखे, प्रकाश महाराज कातकडे आणि ऋषिकेश महाराज फटांगरे यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा तसेच महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन कृष्णदेव बाबा भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

SPOT NEWS



## बॉक्सिंग स्पर्धेत नागवडे महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे १५ सप्टेंबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे महाविद्यालयातील पाच खेळाडूंनी सहभाग नोंदविला. त्यापैकी दोन खेळाडूंची पुणे विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नागवडे महाविद्यालयातील रमजान पठाण (६० ते ६५ किलो वजनी गट, तृतीय वर्ष बी.एस्सी.) आणि नाहीद पठाण (९२ किलोपेक्षा अधिक वजनी गट, द्वितीय वर्ष बी.कॉम.) यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल दोन्ही खेळाडूंचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, अनुराधाताई नागवडे, संस्थेचे निरीक्षक सचिन लगड, सर्व विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, उपप्राचार्य कातोरे सर तसेच पर्यवेक्षक टकले सर यांनी दोन्ही खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले. खेळाडूंना डॉ. सतीश चोरमले आणि डॉ. महेश गिरमकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या दोन्ही खेळाडूंना पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## मुकुंदनगर प्रवेशद्वारावर स्पीड ब्रेकर बसवा, अन्यथा रास्ता रोकोचा इशारा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

संभाजीनगर ते पुणे रोडदरम्यान मुकुंदनगर प्रवेशद्वाराजवळील मुख्य रस्त्यावर स्पीड ब्रेकर बसवावेत, अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबत अहिल्यानगर जागतिक बँक प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. संभाजीनगर ते पुणे रोडदरम्यान मुकुंदनगर हा दाट लोकवस्तीचा परिसर असून, या भागात महानगरपालिका कार्यालयासह विविध शासकीय कार्यालये आहेत. तसेच सकाळच्या वेळेत शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने या रस्त्यावरून ये–जा करतात. या मार्गावरून वाहने वेगाने ये–जा करत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे मुकुंदनगर प्रवेशद्वाराजवळील मुख्य रस्त्यावर तातडीने स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मार्गावर वन कार्यालयासमोर पूर्वी स्पीड ब्रेकर बसविण्यात आले होते. मात्र, रस्त्याच्या पॅचिंगच्या कामामुळे ते नष्ट झाले आहेत. मागणीची दखल न घेतल्यास रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही संबंधित अधिकाऱ्यांना समक्ष भेटून देण्यात आला. या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अथर खान, महिला शहर जिल्हाध्यक्ष अर्चना गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष समीर पठाण, युवक शहराध्यक्ष रोहन शेलार, जिल्हा समन्वयक परवेज शेख, जिल्हा महासचिव इनुस शेख सर, फारूक रंगरेज, जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख आदींच्या सह्या आहेत.

# शेवगाव तालुका दुष्काळग्रस्त घोषित करण्यासाठी निदर्शने

### भाकप, किसान सभा, शिवसेना (उबाठा) व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तहसील कार्यालयासमोर आंदोलन

**● शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव तालुका दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना तातडीने मदत व दुष्काळी उपाययोजना कराव्यात, या प्रमुख मागणीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप), महाराष्ट्र राज्य किसान सभा, शिवसेना (उबाठा) तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने बुधवारी (दि. १६) तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष दुष्काळी परिस्थितीकडे वेधले.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी बोलताना ॲड. लांडे म्हणाले, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळाबाबत केवळ चर्चा व चिंता व्यक्त करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून आवश्यक उपाययोजना कराव्यात.



शेवगाव तालुक्यात यंदा अत्यल्प पाऊस झाल्यामुळे खरीप हंगाम धोक्यात आला असून शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. पेरणी, मशागत आणि बियाणांसाठी खर्च करूनही पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत सापडल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

ॲड. लांडे यांनी शासनाकडून दुष्काळ जाहीर करण्यास विलंब होत असल्याचा आरोप केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, कर्नाटक सरकारने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर केली आहे; मात्र महाराष्ट्र सरकारकडून दुष्काळी परिस्थितीबाबत अपेक्षित निर्णय घेतला जात नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

शासनाने तातडीने शेवगाव तालुका दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. शासनाने लवकर निर्णय घेतला नाही तर शेवगाव तालुक्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उबाठा)चे तालुकाध्यक्ष ॲड. अविनाश मगरे आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे यांनी दिला.

आंदोलनानंतर तहसीलदार आकाश दहाडदे यांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देणे, जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, पीक विमा योजनेअंतर्गत आगाऊ विमा मंजूर करणे, कृत्रिम पावसाचे नियोजन करणे, दिवसा अखंड व सुरळीत वीजपुरवठा करणे तसेच शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या विविध शुल्कात माफी देण्याची मागणी करण्यात आली. वाढती महागाई नियंत्रणात आणण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी कॉ. संदिप इथापे, किसान सभेचे बापूराव राशिनकर, बबनराव पवार, विष्णू गोरे, गोरक्षनाथ काकडे, शिवसेना (उबाठा)चे जिल्हाप्रमुख रामनाथ गोल्हार, राजेंद्र दळवी, ॲड. अविनाश मगरे, कानिफनाथ कर्डिले, अजिंक्य लव्हाट, उदय गांगुर्डे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दत्तात्रय फुंदे, मच्छिंद्र आरले यांच्यासह राम लांडे, भिवसेन घोरपडे, अर्जुन खैरे, बाळासाहेब म्हस्के, शंकर देवडे, मुरलीधर काळे, विष्णू चव्हाण, भीमराज ढगे, विठ्ठल उगले, बाळा बागल तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाथर्डी-शेवगाव तालुक्यातील पिकांची प्रत्यक्ष पाहणी व पंचनामे करून तातडीने मदत द्यावी; प्रा. सुनील पाखरे

**● पाथर्डी । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी व शेवगाव तालुक्यांत पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके पाण्याअभावी अडचणीत आली आहेत. पिकांची वाढ खुंटल्याने शेतकऱ्यांचा लागवड खर्च वाया जाण्याची शक्यता असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते प्रा. सुनील पाखरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवून दोन्ही तालुक्यांतील परिस्थितीची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पावसाने ओढ दिल्याने तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप पिकांसह विहिरी व अन्य जलस्रोतांमधील पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. पाथर्डी व शेवगाव तालुक्यांना यापूर्वीही पावसाच्या अनियमिततेमुळे पिके सुकणे, जनावरांसाठी चारा तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाई अशा संकटांना सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे शासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात



घेऊन वेळीच उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे पाखरे यांनी नमूद केले.

शासन व प्रशासनाने केवळ कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पिके व पाण्याची परिस्थिती तपासावी. पाथर्डी व शेवगाव तालुक्यांतील पिकांची तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

पावसाअभावी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, पात्र शेतकऱ्यांना पीकविमा नुकसानभरपाई मिळण्यासाठी विशेष कार्यवाही करावी, जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, तसेच पाणीटंचाई असलेल्या गावांमध्ये गरजेनुसार टँकर सुरू करावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

परिस्थिती गंभीर असलेल्या भागात दुष्काळसदृश उपाययोजना लागू कराव्यात. शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट लक्षात घेऊन कर्ज व वीजबिलाबाबत दिलासा देण्याचा निर्णय घ्यावा. तसेच पावसाचा खंड कायम राहिल्यास भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन तातडीचे आणि दीर्घकालीन जलव्यवस्थापनाचे नियोजन करावे, अशी मागणी प्रा. पाखरे यांनी केली आहे.

बळीराजाला केवळ आश्वासनांची नव्हे, तर कठीण काळात प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा लक्षात घेऊन शासन, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने संवेदनशीलतेने तातडीने निर्णय घेऊन योग्य तो पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा प्रा. पाखरे यांनी व्यक्त केली.

या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. शिवाजीराव गर्जे, आ. मोनिका राजीव राजळे, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, उपविभागीय अधिकारी पाथर्डी तसेच तहसीलदार पाथर्डी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी देण्यात आल्या आहेत.

### भारतीय तत्त्वज्ञानाचा संदेश घेऊन डॉ. पारनेरकर पारनेरमध्ये दाखल; माजी नगराध्यक्ष विजय औटी यांच्याकडून स्वागत



**● पारनेर । वीरभूमी –**

भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती आणि पूर्णवाद तत्त्वज्ञानाचा प्रचार–प्रसार करण्याच्या उद्देशाने पाश्चिमात्य देशांचा दौरा पूर्ण करून प.पू. डॉ. श्री. विष्णू महाराज पारनेरकर यांचे चिरंजीव डॉ. लक्ष्मीकांतजी पारनेरकर यांचे पारनेर शहरात आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी हिंद चौक येथे पारनेर नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष विजय औटी व माजी नगरसेवक नंदकुमार औटी मित्र मंडळाच्या वतीने स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला.

परदेश दौऱ्यात डॉ. लक्ष्मीकांतजी पारनेरकर यांनी विविध देशांतील नागरिकांना भारतीय संस्कृती, अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि पूर्णवाद तत्त्वज्ञानाची माहिती करून दिली. भारतीय जीवनपद्धती, संस्कार, आध्यात्मिक विचार आणि मानवकल्याणाचा संदेश पोहोचविण्यासाठी त्यांनी विविध ठिकाणी व्याख्याने, संवाद व मार्गदर्शन केले.

पारनेर येथे आगमन झाल्यानंतर हिंद चौकात माजी नगराध्यक्ष विजय औटी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त स्वागत करून भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृतीचा परदेशात प्रचार–प्रसार केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी माजी उपसरपंच विजय डोळ, बापूशेठ बोरुडे, संदीप मोढवे यांच्यासह विविध मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. लक्ष्मीकांतजी पारनेरकर यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञानाचा व्यापक परिचय जगभर करून देण्याचे कार्य पुढेही सुरू राहावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## मुलिका देवी गणेशोत्सव मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**● निघोज । वीरभूमी–**

वराळ–ठुबे कुंड वस्ती परिसरातील श्री. मुलिका देवी गणेशोत्सव मंडळ यंदा ५० वे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत असून, त्यानिमित्त आयोजित विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना परिसरातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मंडळाने संपूर्ण गणेशोत्सवासाठी दररोज विविध कार्यक्रमांचे नियोजन केले आहे.

सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त चार दिवस सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी मंगळागौरी कार्यक्रम, कु. निलमताई इचके यांचा 'होम मिनिस्टर' कार्यक्रम तसेच स्वररागिणी वर्षा एखंडे यांचा भक्तिगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दररोज सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत भाविक दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. सकाळ–संध्याकाळ महाआरती आणि सत्यनारायण महापूजेसारख्या धार्मिक कार्यक्रमांनाही भाविकांचा



मोठा प्रतिसाद मिळत आहे.

गेल्या ५० वर्षांत मंडळाने धार्मिक कार्यासोबतच सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांतही सक्रिय सहभाग घेत गावाच्या विकासात योगदान दिले आहे. कुंड परिसरातील जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मळगंगा देवीच्या नवरात्रोत्सव व यात्रा उत्सवात वराळ–ठुबे वस्तीचा नेहमीच सक्रिय सहभाग राहिला आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुंड वस्तीच्या विकासासाठीही या वस्तीतील ग्रामस्थ सातत्याने आर्थिक सहकार्य करीत असून, विविध शैक्षणिक उपक्रम व शाळेच्या विकासाला पाठबळ देत आहेत. निघोज व परिसरातील ग्रामअभियान, ग्रामस्वच्छता यांसारख्या उपक्रमांत मंडळाचे पदाधिकारी व सदस्य आवर्जून सहभागी होत सेवाभाव जपत आहेत.

निघोज व पंचक्रोशीतील सेवाभावी गणेश मंडळ म्हणून मंडळाचा लौकिक आहे. मंडळाच्या वाटचालीत ज्येष्ठ मार्गदर्शक पांडुरंग तात्या वराळ, संदीप वराळ, ज्ञानदेव वराळ, गजानन ठुबे, दिलीप वराळ, शरद ठुबे, दीपक ठुबे, रोहन वराळ, सावळा वराळ, श्रीकांत वराळ, भास्कर वराळ, पुणेकर व मुंबईकर मंडळ तसेच सर्व पदाधिकारी, सदस्य, ग्रामस्थ व महिला भगिनींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

# डेबूजी प्रतिष्ठाणची विविध जिल्हा व तालुका कार्यकारिणी जाहीर

### शिर्डी येथे १५ नोव्हेंबरला परीट-धोबी समाजाचा वधू-वर मेळावा

**● शिर्डी । वीरभूमी–**

स्वच्छता, सेवा, सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात कार्य करण्याबरोबरच गुणवंतांचा गौरव करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या डेबूजी प्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्याच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रतिष्ठाणच्या माध्यमातून शिर्डी येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात गाडगेबाबांच्या विचारांचा आदर्श घेऊन कार्य करणाऱ्या मान्यवरांचा खास टपाल तिकीट काढून सन्मान करण्यात आला. तसेच विविध साहित्यिक उपक्रमही राबविण्यात आले.

आता प्रतिष्ठाणच्या वतीने शिर्डी येथे १५ नोव्हेंबर रोजी परीट–धोबी समाजाचा वधू–वर मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून, त्याच्या जनजागृतीसह प्रतिष्ठाणचे विविध उपक्रम महाराष्ट्रभर राबविण्यासाठी विविध जिल्हे व तालुक्यांच्या कार्यकारिणी जाहीर करण्यात आल्या आहेत.

ही घोषणा प्रतिष्ठाणचे संस्थापक राजेंद्र फंड, अध्यक्ष सुनील निकम, उपाध्यक्ष माधवराव देसाई व खजिनदार सुधाकर देसाई यांनी केली.

जिल्हास्तरीय पदाधिकारी : दिनेश जयराम वाघ (उपजिल्हा प्रमुख, अहिल्यानगर), गुलाबराव भदाणे (जिल्हाध्यक्ष, जळगाव), संतोष राऊत (जिल्हाध्यक्ष, संभाजीनगर), डॉ. पी. आर. विभूतवार (जिल्हाध्यक्ष, नांदेड), योगिता भागवत (जिल्हाध्यक्ष, बीड), श्रीधर जाधव (जिल्हाध्यक्ष, हिंगोली), जयराम चव्हाण (जिल्हाध्यक्ष, धाराशिव), नूतन रसाळ (जिल्हाध्यक्ष, सोलापूर), अशोकराव जाधव (जिल्हाध्यक्ष, जालना), सुनील वाघ (जिल्हाध्यक्ष, बुलढाणा), शंकरराव बनसोडे (जिल्हाध्यक्ष, परभणी), रंगनाथ घोडके (जिल्हाध्यक्ष, लातूर), कैलास शिलोडे (सह जिल्हाध्यक्ष, जळगाव), संगीता अनिल बाविस्कर (अध्यक्ष, मुंबई शहर), संदीप चांगदेव भागवत (अध्यक्ष, नाशिक शहर), अमोल शिंदे (अध्यक्ष, कल्याण शहर), तालुकास्तरीय पदाधिकारी : सागर राजेंद्र रोकडे (तालुकाध्यक्ष, राहाता), सुभाषराव देसाई (तालुका उपाध्यक्ष, राहाता), हनुमान पंडित गवळी (अध्यक्ष, कोपरगाव), सुनील चांगदेव राऊत (अध्यक्ष, श्रीरामपूर), गोरख भागवत (उपाध्यक्ष, श्रीरामपूर), अनिल शंकरराव विधाटे (अध्यक्ष, राहुरी), दत्तात्रय भागवत रंधे (अध्यक्ष, संगमनेर), संतोष महादेव ठाणेकर (अध्यक्ष, अकोले), बाबासाहेब शहादेव आदमाने (अध्यक्ष, नेवासा), शेषराव लक्ष्मण बर्वे (उपाध्यक्ष, नेवासा), भारत गवळी (सचिव, नेवासा), सुनील जाधव (अध्यक्ष, शेवगाव), ईश्वर शांतीलाल गायकवाड (अध्यक्ष, पाथर्डी), नितीन राऊत (अध्यक्ष, येवला), जनाभाऊ घोडके (अध्यक्ष, गंगापूर), अभय आबा त्रिभुवन (अध्यक्ष, वैजापूर), विठ्ठल राऊत (अध्यक्ष, पैठण), एकनाथ तायडे (अध्यक्ष, पाथरी), प्रकाश राऊत (अध्यक्ष, गेवराई), राजू राऊत (तालुकाध्यक्ष, कन्नड), ज्ञानेश्वर उबाळे (अध्यक्ष, मंठा), राजू मामा गाडेकर (अध्यक्ष, चिखली), अशोक शिंदे (अध्यक्ष, संभाजीनगर तालुका), राहुल हजारे (अध्यक्ष, खुलताबाद), योगिता सुरे (उपाध्यक्ष, कोपरगाव), डॉ. अभिमन्यू सोनटक्के (अध्यक्ष, बार्शी), प्रसिद्धी प्रमुख : राजेंद्र देसाई (श्रीरामपूर), महादेव दळे (कासारपिंपळगाव) आणि योगेश सगर (नाशिक) यांची प्रसिद्धी प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. उर्वरित जिल्हे व तालुक्यांमधील जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय निवडी लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे प्रतिष्ठाणच्या वतीने सांगण्यात आले.

# मोहटादेवी नवरात्रोत्सवासाठी प्रशासन सज्ज

## अतिक्रमणे हटविण्यासह विविध विभागांना जबाबदाऱ्या । गैरहजर अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**● पाथर्डी । वीरभूमी-**

श्रीक्षेत्र मोहटादेवी येथे होणाऱ्या शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तयारीला वेग दिला असून, भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी विविध विभागांना जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. रविवार, दि. ११ ऑक्टोबर ते रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणाऱ्या महोत्सवाच्या नियोजनासाठी मोहटादेवी देवस्थानच्या सभागृहात उपविभागीय अधिकारी तथा मोहटादेवी यात्रा नोडल अधिकारी प्रसाद मते यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन व आढावा बैठक झाली.

बैठकीच्या प्रारंभी देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी महोत्सव काळात विविध शासकीय विभागांकडून करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा मांडला. यावेळी तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, पाथर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, एसटी आगार व्यवस्थापक अमित बनसोडे, तालुका आरोग्य अधिकारी भगवान दराडे, वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन दरंदले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता राहुल कांबळे, महावितरणचे उपअभियंता कुकडे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे चंद्रकांत रासकर, देवस्थानचे विश्वस्त शशिकांत दहिफळे, अशोक दहिफळे, बाळासाहेब लाहोटी, बाबासाहेब दहिफळे, उपसरपंच अविनाश फुंदे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नवरात्रोत्सव सुरू होण्यापूर्वी देवीगडाकडे जाणाऱ्या शहरातील तसेच इतर सर्व मार्गांवरील अतिक्रमणे तातडीने हटविण्याचे निर्देश प्रसाद मते यांनी दिले. राष्ट्रीय महामार्ग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यालगतची अतिक्रमणे तसेच काटेरी झुडपे हटविण्याचे आदेश देण्यात आले. नगरपरिषद हद्दीतील रस्ते अतिक्रमणमुक्त करून वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी नगरपरिषदेला देण्यात आली.



अन्न व औषध प्रशासन तसेच दूरसंचार विभागाचा एकही अधिकारी बैठकीस उपस्थित नसल्याने प्रसाद मते यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश त्यांनी दिले.

महोत्सवादरम्यान भाविकांच्या सोयीसाठी अग्निशमन वाहन, फिरती शौचालये, पुरेसा प्रकाश, पिण्याच्या पाण्याची तपासणी, २४ तास ओपीडी सेवा, रुग्णवाहिका तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. राज्य परिवहन महामंडळाकडून ११० एसटी बसची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

महावितरणकडून २४ तास अखंड वीजपुरवठा, डीपी, विद्युत तारा व पोलांची दुरुस्ती तसेच पालखी मार्गावरील विद्युत व्यवस्था सुरळीत ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अवैध दारू विक्री रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष मोहीम राबवावी, तर महोत्सव काळात नेहमीपेक्षा अधिक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचे संबंधित विभागांकडून सांगण्यात आले.

गर्दीच्या काळात एकेरी वाहतूक व्यवस्था, आवश्यक ठिकाणी प्रवेशद्वारे उभारणे तसेच मोहटादेवी मंदिर ते मोहटागाव पालखी मार्गाची दुरुस्ती तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले. वन विभागाने दरवर्षीप्रमाणे आवश्यक बंदोबस्त ठेवण्याबरोबरच नवीन अतिक्रमणे होणार नाहीत, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीच्या शेवटी देवस्थानच्या वतीने उपविभागीय अधिकारी प्रसाद मते व तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी केले, तर आभार विश्वस्त शशिकांत दहिफळे यांनी मानले.

### जोडरस्त्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

■ दरवर्षीप्रमाणे तनपूरवाडी राष्ट्रीय महामार्ग ते शासकीय आयटीआयपर्यंतच्या महत्त्वाच्या जोडरस्त्याचा प्रश्न यंदाही बैठकीत चर्चेला आला. अनेक वर्षांपासून या रस्त्याची मालकी जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग की नगरपरिषद याबाबत स्पष्टता नसल्याने प्रश्न प्रलंबित आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे यात्रेकरूंची मोठी गैरसोय होत असून, या ठिकाणी यापूर्वी छोटे-मोठे अपघातही झाले आहेत. यात्राकाळात किमान मुरूम टाकून रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी होत आहे. मागील तीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याचे डांबरीकरण पुढील वर्षापर्यंत पूर्ण केले जाईल, अशी माहिती नगरपरिषदेच्या वतीने देण्यात आली.

# तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत चापडगाव विद्यालयाचे घवघवीत यश

## पाच गटांत चमकदार कामगिरी । चार प्रथम क्रमांकांसह एक द्वितीय क्रमांक पटकावला

**● शेवगाव । वीरभूमी-**

क्रीडा व युवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे विभाग व अहिल्यानगर जिल्ह्याच्या अंतर्गत शेवगाव तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींनी सहभाग घेतला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश दहिफळे व विस्तार अधिकारी सचिन भाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापक सुनील जायभाय, पर्यवेक्षक संजय दुधाडे, क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर तहकीक, सादिक शेख यांच्यासह शेवगाव तालुक्यातील विविध विद्यालयांतून आलेले क्रीडा शिक्षक व खेळाडू उपस्थित होते.



तालुकास्तरीय स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील एकूण २६ संघांनी सहभाग नोंदविला. चुरशीच्या वातावरणात झालेल्या या स्पर्धेत चापडगाव विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत उल्लेखनीय यश संपादन केले.

चापडगाव विद्यालयाने १४ वर्षे मुले - प्रथम क्रमांक, १४ वर्षे मुली - द्वितीय क्रमांक, १७ वर्षे मुले - प्रथम क्रमांक, १७ वर्षे मुली - प्रथम क्रमांक आणि १९ वर्षे मुली - प्रथम क्रमांक मिळविला. अशा प्रकारे विद्यालयाने चार प्रथम क्रमांक व एक द्वितीय क्रमांक पटकावत तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

या यशस्वी खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष डॉ. ॲड. विद्याधरजी काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंगभैय्या काकडे, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहशालेय प्रमुख अशोक आहेर, कांतेश्वर ढोले, विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते, उपप्राचार्य सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशामुळे विद्यालयाचे वातावरण क्रीडामय झाले होते. विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर तहकीक व सादिक शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

# संत वामनभाऊ मंडळाने १११ किलो रद्दीपासून साकारली पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

**● पाथर्डी । वीरभूमी-**

शहरातील संत वामनभाऊ तरुण मंडळाने यंदा १११ किलो रद्दीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारून आगळावेगळा आणि लक्षवेधी उपक्रम राबविला आहे. प्रभागातील रहिवाशांकडून रद्दी संकलित करून त्यापासून कागदाची गणेशमूर्ती तयार करण्यात आली. गुलाल, डीजे आणि प्लास्टिकमुक्त गणेशोत्सवाचा संदेश देत मंडळाने विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

शहरातील जय भवानी चौकात अत्यंत प्राचीन आणि भव्य गणेशमूर्ती असलेले गणेश मंदिर आहे. या मंदिराला शेकडो वर्षांचा इतिहास असून, शहरवासीयांची या गणेश मंदिराबद्दल विशेष श्रद्धा आहे. गणेश विसर्जन मिरवणूकही या मंदिरासमोरून जाते. संत वामनभाऊ मंडळाने याच मानाच्या गणेशमूर्तीची हुबेहूब प्रतिकृती कागदापासून साकारल्याने गणेशमूर्ती पाहण्यासाठी परिसरातील नागरिक व भाविकांनी मोठी गर्दी केली.

मंडळाचे अध्यक्ष सचिन नागापुरे यांनी कागदापासून गणेशमूर्ती साकारण्याची संकल्पना मांडली.





त्यानंतर सर्व कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेत अवघ्या पंधरा दिवसांत मूर्तीचे काम पूर्ण केले. वॉटर कलर, सुतळी आणि चिकटपट्ट्यांच्या साहाय्याने ही मूर्ती तयार करण्यात आली.

या उपक्रमासाठी निवासी मतिमंद बालगृहातील विद्यार्थी, मुख्याध्यापक सचिन तरवडे, कलाशिक्षक अशोक जेधे, अतुल ससे, मुस्ताला शेख, प्रकाश तुजारे तसेच विद्यालयाचे संस्थापक प्रताप निराळी यांचे सहकार्य लाभले. मंडळाचे कार्यकर्ते सिद्धार्थ गायकवाड, कृष्णा जेधे, प्रवीण आव्हाड, प्रणव गव्हाणे, कार्तिक कराड, विराज गर्जे, ऋषिकेश गायकवाड, भूषण नागापुरे, लक्ष बाफना यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी योगदान दिले.

मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. मृत्युंजय गर्जे, संतोष गायकवाड, धनंजय बडे, अनिल ढाकणे, नंदुरबारचे पोलीस निरीक्षक किरण खेडकर, नितीन गर्जे आदींचे मार्गदर्शन लाभले. दरम्यान, खुले नाट्यगृहापासून वामनभाऊ नगरपर्यंत महिला भाविकांसह टाळ-मृदंगाच्या पथकाने शिस्तबद्ध आणि लक्षवेधी गणेशस्थापना मिरवणूक काढली. शहरात सुवर्णयुग मंडळानंतर संत वामनभाऊ गणेश मंडळामध्येही महिला कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग पाहायला मिळत आहे.

याबाबत माहिती देताना मंडळाचे अध्यक्ष सचिन नागापुरे म्हणाले, सध्या पर्यावरणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. जंगलतोड, प्लास्टिकचा अनिर्बंध वापर आणि भूगर्भातील पाण्याचा वाढता उपसा यांसारख्या कारणांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. त्याचा परिणाम ऋतुचक्रावर तसेच सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. शासन व प्रशासनाकडून प्लास्टिकविरोधात विविध उपाययोजना केल्या जात असल्या तरी लोकसहभाग आणि जनजागृतीशिवाय ही समस्या पूर्णपणे दूर होऊ शकत नाही.



## वीरभूमी गणपती बाप्पा मोरया
## 'सेल्फी विथ गणेशा'



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : कु. गार्गी श्रीपादराव चौधरी, रा. छत्रपती संभाजीनगर



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : चि. गौरव गोरक्ष सोनटक्के व चि. आदेश अजिनाथ सोनटक्के, रा. पाथर्डी



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : सौ. मनीषा शशिकांत बांगर, रा. लोकनेते गोपीनाथ मुंडे नगर, शिरूर कासार, जि. बीड